# महाराष्ट्र विधानपरिषद
## पत्रक भाग दोन
## सोमवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८/कार्तिक २८, १९४० (शके)

**१७३. सदस्यांना सन २०१८-२०१९ च्या पूरक मागण्यांच्या प्रती वितरीत केल्याबाबत :-**

सर्व सदस्यांना कळविण्यात येत आहे की, मा.वित्त मंत्र्यांनी सन २०१८-२०१९ च्या पुरवणी मागण्या सोमवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ रोजी सभागृहास सादर केल्या असून या पुरवणी मागण्यांच्या प्रती सोमवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ रोजी टपालखणाद्वारे वितरित करण्यात आल्या आहेत.

**१७४. महाराष्ट्र विधानपरिषदेत सन २०१८-२०१९ च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा :-**

सन २०१८-२०१९ च्या पुरवणी मागण्या विधानपरिषदेत सोमवार, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ व मंगळवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी चर्चेसाठी घेण्यात येत आहेत. त्याबाबतीत सदस्यांचे लक्ष महाराष्ट्र विधानपरिषद नियम २३० (४) कडे वेधण्यात येत आहे. त्यानुसार पुरवणी मागण्यांवरील चर्चेत जे विवक्षित मुद्दे उपस्थित करावयाचे असतील, अशा मुद्दयांची आगाऊ सूचना देता येईल. वेगवेगळ्या विभागाच्या पूरक मागण्यांविषयीचे विवक्षित मुद्दे गुरूवार, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यन्त या सचिवालयाच्या विधानपरिषद "ई-२" कक्षात आणून द्यावेत, अशी सदस्यांना विनंती आहे. त्यानंतर प्राप्त झालेले मुद्दे विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच प्रत्येक विभागाचे मुद्दे स्वतंत्र द्यावेत व मुद्दयांच्या प्रत्येकी तीन प्रती द्याव्यात अशीही सदस्यांना विनंती आहे.

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : १९ नोव्हेंबर, २०१८

**डॉ.अनंत कळसे**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य.
२) मा.सभापती, विधानपरिषद यांचे सचिव.
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
५) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
७) संगणक कक्ष (website)